# मुंबई विद्यापीठ

निवडणूक विभाग
अत्यंत महत्वाचे

e-mail- arelection@mu.ac.in
Tel. No. - 022-2270 8710
022-2269 6147

क्र.नि.वि. इएल/सिनेट-२५(२)(पी)/४३ फ २०१०
दिनांक १९ नोव्हेंबर, २०१०

**निवडणूक अधिसूचना -**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(पी) मधील तरतूदीनुसार विद्यापीठाचे विभाग संलग्न/संचालीत/स्वायत्त महाविद्यालये/स्वायत्त संस्था किंवा विभाग किंवा मान्यताप्राप्त संस्थेमधील शिक्षकांसाठी २० जागा विद्यापीठाच्या अधिसभेवर निवडून देण्यासाठीची कार्यक्रम सुची (त्यापैकी तीन जागा महिलांसाठी आणि एक जागा विमुक्त जाती व भटक्या जमाती (DT/NT) व एक जागा इतर मागास वर्गीय (OBC) या प्रवर्गासाठी चक्रिय आरक्षणानुसार राखीव-विमुक्त जाती व भटक्या जमाती (DTNT) इतर मागास वर्गीय (OBC) या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती या प्रवर्गाचा विचार करण्यात येईल.)

राखीव जागेसाठी अर्ज करणा-या उमेदवाराने नामनिर्देशन अर्जासोबत साक्षांकित केलेले जातीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असून छाननीच्या वेळी जातीचे मुळ प्रमाणपत्र आणावे लागेल. तसेच निवडुन आल्यानंतर सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

परिपत्रक क्रमांक क्र.नि.वि. इएल/सिनेट-२५(२)(पी)/४३-इ २०१० दिनांक ११ नोव्हेंबर, २०१० अन्वये प्रसिध्द केलेल्या मतदार यादीनुसार विद्याशाखानिहाय नोंदणी झालेल्या मतदारांची संख्या व त्यानुसार १५ खुल्या जागा, ३ जागा महिलांसाठी आणि २ जागा राखीव प्रवर्गासाठी करावयाचे वाटप खालिल प्रमाणे असेल :-

| अनु क्र | खुला प्रवर्ग | एकुण शिक्षक मतदार | जागांचे वाटप |
|---|---|---|---|
| १ | कला शाखेतील शिक्षक | ११७४ | ४ |
| २ | विज्ञान शाखेतील शिक्षक | १००५ | ३ |
| ३ | तंत्रज्ञान शाखेतील शिक्षक | १०७९ | ४ |
| ४ | विधी शाखेतील शिक्षक | २२ | १ |
| ५ | वाणिज्य शाखेतील शिक्षक | ६९३ | २ |
| ६ | फाईन आर्ट शाखेतील शिक्षक | २५ | १ |

(शाखानिहाय कितीही मतदार असले तरीही प्रत्येक शाखेस किमान एक जागा असेल).

कुलपतींनी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार महाविद्यालयीन ग्रंथपालास परिनियम ४३९(ए) प्रमाणे प्रत्यक्ष शिकविण्याचा पाच वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.

**महिला प्रवर्ग - ३ जागा**

| अनु क्र | शाखेचे नांव | एकुण शिक्षक मतदार | जागा |
|---|---|---|---|
| | गट - १ | | |
| १ | कला शाखेतील शिक्षक | ११७४ | १ |
| | गट - २ | | |
| १ | विज्ञान शाखेतील शिक्षक | १००५ | १ |
| २ | वाणिज्य शाखेतील शिक्षक | ६९३ | |
| | गट - ३ | | |
| १ | तंत्रज्ञान शाखेतील शिक्षक | १०७९ | १ |
| २ | विधी शाखेतील शिक्षक | २२ | |
| ३ | फाईन आर्ट शाखेतील शिक्षक | २५ | |

राखीव प्रवर्ग :- एक जागा - विजाभज (DTNT), एक जागा - ईमाव (OBC)

परिनियम ३५५(ए) आणि महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ११५(२)(xii) नुसार कुलगुरुंनी वरील मतदार संघासाठी बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१० ही निवडणुकीची तारीख निश्चित केली आहे.

१) अंतिम मतदार यादी परिपत्रक क्र. क्र.नि.वि. इएल/सिनेट-२५(२)(पी)/४२-इ २०१० गुरुवार दिनांक ११ नोव्हेंबर, २०१० अन्वये दिनांक ११ नोव्हेंबर, २०१० रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. अंतिम मतदार यादीप्रमाणे या निवडणुका घेण्यात येत आहेत.

२) परिनियम ३६१ नुसार कुलगुरुंना मतदार यादीत दुरुस्ती करण्याचे अधिकार आहेत.परिनियम ३६१ खालीलप्रमाणे आहे:-

> *"The Vice-Chancellor shall have the authority to correct the rolls, if any omission or wrong entries be brought to his notice at least 15 clear days before the date of election. The Vice-Chancellor's decision in the matter shall be final."*

३) विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादीत नावे समाविष्ट असलेल्या शिक्षकांनाच या निवडणुकीत भाग घेता येईल.

४) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ४२(१) नुसार प्रत्येक प्राधिकरणाचा कालावधी १ सप्टेंबर, २०१० पासून पाच वर्षापर्यंत असेल.

सदर निवडणुकीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.:-

| अ. क्र. | **तपशील** | **वार, तारीख, व वेळ** |
|---|---|---|
| १ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द | गुरुवार, दिनांक ११ नोव्हेंबर, २०१० |
| २ | अंतिम मतदार यादी शुध्दी पत्र (आवश्यकता भासल्यास) | शनिवार, दिनांक ४ डिसेंबर, २०१० |
| ३ | नामनिर्देशन अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख | मंगळवार, ३० नोव्हेंबर, २०१० (दुपारी ४:०० पर्यंत) |
| ४ | नामनिर्देशन अर्ज छाननी | बुधवार, १ डिसेंबर, २०१० |
| ५ | नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची तारीख | गुरुवार, २ डिसेंबर, २०१० (दुपारी ४:०० पर्यंत) |
| ६ | उमेदवारांची नावे आणि मतदानासाठी केंन्द्राचे नांव पाठविण्याची तारीख | शनिवार, ११ डिसेंबर, २०१० |
| ७ | निवडणुकीची तारीख, वार व वेळ | बुधवार, २२ डिसेंबर, २०१० (सकाळी ९:०० ते सांयकाळी ५:०० पर्यंत) |
| ८ | मतमोजणी तारीख, वार व वेळ, | गुरुवार, २३ डिसेंबर, २०१० |

५) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २४ (ए) अन्वये महाराष्ट्र शासनाने कोणत्याही प्रधिकरणावर/मंडळावर निवडुन येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी दिनांक १४ सप्टेंबर, २००९ अंतर्गत विहीत केलेल्या पात्रता व शर्ती विद्यापीठाने परिपत्रक क्रमांक नि.वि.(६४)/३२/२०१०. दिनांक १७ फेब्रुवारी, २०१० अन्वये सर्व संबंधिताना पाठविल्या आहेत. सदर पात्रता व शर्ती बंधनकारक आहेत. विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेत स्थळावर सदर परिपत्रक उपलब्ध आहे.

....३/-

६) मतदार याद्या खालील ठिकाणी उपलब्ध आहेत.
(किंमत रु.३००/- प्रत्येकी, रु. १५०/-सिडी प्रत्येकी):-

अ) सहायक कुलसचिव, निवडणूक विभाग, कक्ष क्रमांक ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२

ब) उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, तळ मजला, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसर, कालीना, सांताक्रुज (पूर्व), मुंबई - ४०० ०९८

क) सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंन्द्र, मुंबई विद्यापीठ, पी-६१, एम.आय.डी.सी., मिरजोळे, जिल्हा-रत्नागिरी ४१५६३९

७) विहीत नमुन्यातील नामनिर्देशन अर्ज परिपूर्णरित्या भरणे आवश्यक आहे. अपूर्ण अर्ज फेटाळण्यात येतील.

८) विहीत नमुन्यातील नामनिर्देशन अर्जासाठी मतदाराने खालील ठिकाणी अर्ज करावा.:-

(अ) कुलसचिव-तथा-निवडणुक निर्णय अधिकारी, निवडणुक विभाग, कक्ष क्रमांक ११०, पहिला मजला, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.

(ब) सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंन्द्र, मुंबई विद्यापीठ, पी-६१, एम.आय.डी.सी., मिरजोळे, जिल्हा - रत्नागिरी - ४१५६३९.

९) नामनिर्देशन अर्जाची छाननी सुचक/अनुमोदक किंवा प्रतिनिधी यापैकी कोणीही एक उमेदवार उपस्थीत राहू शकेल परंतु त्याकरिता कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांची मान्यता घ्यावी लागेल.

१०) उमेदवारांची नावे आणि मतदान केन्द्राचे नांव स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

११) परिनियम ३७३ मध्ये दिलेल्या पद्धतीनुसार मतदान केन्द्रावर मतदान होईल.

दिनांक- १९ नोव्हेंबर, २०१० | प्रभारी कुलसचिव
स्थळ- मुंबई | तथा निवडणूक निर्णय अधिकारी

प्रत माहितीसाठी रवाना :-

१. विद्यापीठातील विभागप्रमुख/संचालक, प्राचार्य, संलग्न/स्वायत्त/संचालित महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती करण्यात येते की सदर परिपत्रक त्यांच्या विभागातील, महाविद्यालयातील/संस्थेतील शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.

२. उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, तळ मजला, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसर, कालिना, सांताक्रुज (पूर्व), मुंबई-४०० ०९८;

३. सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेन्द्र, मुंबई विद्यापीठ, पी - ६१, एम. आय. डी. सी., मिरजोळे, जिल्हा - रत्नागिरी-४१५ ६३९;

४. संचालक, सिस्टम नेटवर्क मॅनेजर, विद्यापीठ संगणक केंद्र, कालिना, सांताक्रूज (पूर्व), मुंबई-४०० ०९८, मुंबई विद्यापीठाच्या संकेत स्थळावर सदर परिपत्रक दाखविण्यासाठी.

election2010/marathi(2)/ndp.